# टॅक्विटो लीज ऑपरेटर्स प्रायव्हेट लिमिटेड

सीआयएन : यु७०१०३एमएच२०१२पीटीसी२३१६६२
नोंदणीकृत कार्यालय : २ रा मजला, उमंग टॉवर, माईंडस्पेस, ऑफ लिंक रोड, मालाड (पश्चिम), मुंबई - ४०००६४, दूर. क्र. : ०२२ ४०५५ २२००, फॅक्स क्र. : ०२२ ४०५५२२०१
ई-मेल : investorrelations@futuregroup.in

## सूचना

**कंपनी योजना अर्ज क्र. सीए (सीएए) नं. ८/एमबी/२०२१**

**फ्युचर कन्झ्युमर लिमिटेड (हस्तांतरक कंपनी १), फ्युचर लाइफस्टाइल फॅशन्स लिमिटेड (हस्तांतरक कंपनी २), फ्युचर मार्केट नेटवर्क्स लिमिटेड (हस्तांतरक कंपनी ३), फ्युचर रिटेल लिमिटेड (हस्तांतरक कंपनी ४), फ्युचर सप्लाय चेन सोल्यूशन्स लिमिटेड (हस्तांतरक कंपनी ५), फ्युचरबाजार इंडिया लिमिटेड (हस्तांतरक कंपनी ६), ॲक्यूट रिटेल इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरक कंपनी ७), बासुती सेल्स ॲन्ड ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरक कंपनी ८), बॉटल फूड्स प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरक कंपनी ९), चिराग ऑपरेटिंग लीजिंग कं. प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरक कंपनी १०), हरे कृष्णा ऑपरेटिंग लीज प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरक कंपनी ११), नाइस टेक्सकॉट ट्रेडिंग ॲन्ड एजन्सी प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरक कंपनी १२) निश्ता मॉल मॅनेजमेंट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरक कंपनी १३), ओजस ट्रेडलीज ॲन्ड मॉल मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरक कंपनी १४), प्रीसिजन रियल्टी डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरक कंपनी १५), रिवाझ ट्रेड व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरक कंपनी १६); सीन्टेक्स ट्रेडिंग ॲन्ड एजन्सी प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरक कंपनी १७), टॅक्वीटो लीज ऑपरेटर्स प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरक कंपनी १८), युनिक मॉल्स प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरक कंपनी १९) आणि फ्युचर एन्टरप्रायझेस लिमिटेड (हस्तांतरिती कंपनी वा एफईएल) व त्यांचे संबंधित भागधारक व धनको (भाग १) आणि फ्युचर एन्टरप्रायझेस लिमिटेड (एफईएल) आणि रिलायन्स रिटेल व्हेंचर्स लिमिटेड (आरआरव्हीएल) व त्यांचे संबंधित भागधारक व धनको (भाग २) आणि फ्युचर एन्टरप्रायझेस लिमिटेड (एफईएल) आणि रिलायन्स रिटेल ॲन्ड फॅशन लाइफस्टाइल लिमिटेड (आरआरव्हीएल डब्ल्यूओएस) व त्यांचे संबंधित भागधारक व धनको (भाग ३) यांच्यादरम्यान व्यवस्थेच्या एकत्रित योजनेच्या (योजना व सदर योजना) प्रकरणी**

**टॅक्विटो लीज ऑपरेटर्स प्रायव्हेट लिमिटेड,** )
कंपन्या कायदा, १९५६ अंतर्गत संस्थापित व त्यांच्या )
नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : २ रा मजला, उमंग टॉवर )
माईंडस्पेस, ऑफ लिंक रोड, मालाड (पश्चिम), )
मुंबई - ४०० ०६४, महाराष्ट्र. ) ...अठरावी अर्जदार कंपनी/
सीआयएन : यु७०१०३एमएच२०१२पीटीसी२३१६६२ हस्तांतरक कंपनी १८

**अठराव्या अर्जदार कंपनीचे प्रतिभूत धनको व अ-प्रतिभूत धनकोंच्या सभेची सूचना व सूचनेची जाहिरात**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आदेश दि. २८ सप्टेंबर, २०२१ **(न्यायाधिकरण आदेश)** द्वारे राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरणच्या **(न्यायाधिकरण)** मुंबई खंडपीठाने कंपन्या कायदा, (कायदा) चे अनुच्छेद २३० ते २३२ अन्य लागू तरतुदींअंतर्गत प्रस्तावित योजनेवर विचारविनिमय करणे व योग्य वाटल्यास तिला मंजुरी देण्याच्या उद्देशाने अठराव्या अर्जदार कंपनीचे प्रतिभूत धनको व अ-प्रतिभूत धनको यांची सभा खालील निर्देशित तारखा व वेळांनुसार आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत.

न्यायाधिकरणाचा आदेश व त्यातील निदेशांतर्गत तसेच कायद्याच्या लागू तरतुदी व भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ **(सेबी सूची विनियमन)** यांच्या अनुपालनांतर्गत याद्वारे पुढे सूचना देण्यात येत आहे की, अठराव्या अर्जदार कंपनीचे प्रतिभूत धनको व अ-प्रतिभूत धनको यांची सभा व्हिडीओ कॉन्फरन्सिंग **(व्हीसी)**/अदर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स **(ओएव्हीएम)** या माध्यमातूनं खालीलप्रमाणे आयोजित करण्यात येत आहे :

| अ. क्र. | सभेचा प्रकार | सभेचा दिनांक | सभेची वेळ |
|---|---|---|---|
| १. | प्रतिभूत धनको | १२ नोव्हेंबर, २०२१ | सं. ४.३० वा |
| २. | अप्रतिभूत धनको | १३ नोव्हेंबर, २०२१ | सं. ४.३० वा |

कायद्याचे अनुच्छेद २३० व २३० सहवाचन अनुच्छेद १०२ व अन्य लागू तरतुदी सहवाचन कंपन्या (तडजोडी, व्यवस्था व विलिनीकरण) नियम, २०१६ **(सीएए नियम)** चे नियम ६ अंतर्गत योजनेची प्रत, अहवाल तसेच संलग्न दस्तावेज वेबसाइट www.felindia.in वरून प्राप्त/डाऊनलोड करता येऊ शकतील. कायद्याचे अनुच्छेद २३० व २३२ सहवाचन अनुच्छेद १०२ व अन्य लागू तरतुदी तसेच सीएए नियमाच्या नियम ६ आदींअंतर्गत प्रतिभूत धनको व अप्रतिभूत धनको धनकोंना योजना, अहवाल यांच्या छापील प्रती निःशुल्क प्राप्त करता येतील. यासंदर्भातील एक लेखी विनंती अठराव्या अर्जदार कंपनीला Investorrelations@futuregroup.in येथे पाठवता येईल.

अठराव्या अर्जदार कंपनीचे प्रतिभूत धनको व अ-प्रतिभूत धनकोंच्या सभेसाठी अध्यक्ष म्हणून न्यायाधिकरणाने श्री. मकरंद जोशी यांची, त्यांच्या अनुपस्थितीत श्री. आलोक तिवारी यांची नेमणूक केली आहे. वरील निर्देशित सभांसाठी परीनिरीक्षक म्हणून कु. बिंदू दर्शन शाह (सदस्यत्व क्र. ए२००६६/सर्टिफिकेट ऑफ प्रॅक्टिस नं. ७३७८) - प्रोप्रायटर - मे. के. बिंदू ॲन्ड असोसिएट्स कार्यरत कंपनी सचिव या, त्यांच्या अनुपस्थितीत श्री. संजय ढोलकिया (सदस्यत्व क्र. २६५५/सर्टिफिकेट ऑफ प्रॅक्टिस नं. १७९८) - प्रोप्रायटर - मे. संजय ढोलकिया ॲन्ड असोसिएट्स, कार्यरत कंपनी सचिव हे काम पाहतील. प्रतिभूत धनको व अ-प्रतिभूत धनको यांच्याद्वारे त्यांच्या सभांमध्ये वरील निर्देशित योजना मंजूर झाल्यास ती न्यायाधिकरणाची मंजुरी तसेच नियामक वा अन्य प्राधिकारी यांच्या अशा अन्य मंजुऱ्या, परवानग्या व मान्यता ज्या आवश्यक असतील, त्यांच्या अधीन असेल.

वरील निर्देशित सभेस उपस्थित राहून मत देण्यास पात्र व्यक्ती सभेच्या आधी परोक्ष ई-मतदानाद्वारे त्यांची संबंधित मते देऊ शकतील किंवा ते संबंधित सभांना ई-मतदानाद्वारेही मत देऊ शकतील. प्रतिभूत धनको व अ-प्रतिभूत धनकोंच्या सभा या व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून आयोजित करण्यात येत असल्याने प्रत्यक्ष उपस्थितीची आवश्यकता रहबातल आहे. त्यामुळे, संबंधित सभांकरिता प्रतिनिधींच्या नेमणुकीची उपलब्धता नसेल.

वरील सभांकरिता ई-मतदानाकरिताची निर्धारित अंतिम तारीख व परोक्ष ई-मतदानाचा कालावधी खालीलप्रमाणे आहे :

| तपशील | प्रतिभूत धनकोंची सभा | अप्रतिभूत धनकोंची सभा |
|---|---|---|
| ई-मदानाकरिताची निर्धारित अंतिम तारीख | शनिवार, ३१ जुलै, २०२१ | शनिवार ३१ जुलै, २०२१ |
| परोक्ष ई-मतदान प्रारंभ दिनांक व वेळ | मंगळवार, ०९ नोव्हेंबर, २०२१ स.०९.०० वा. पासून | बुधवार, १० नोव्हेंबर, २०२१ स. ०९.०० वा. पासून |
| परोक्ष ई-मतदान समाप्ती दिनांक व वेळ | गुरुवार, ११ नोव्हेंबर, २०२१ सं. ०५.०० वा. | शुक्रवार, १२ नोव्हेंबर, २०२१ सं. ०५.०० वा. |

निर्धारित अंतिम तारीख अर्थात शनिवार, दि. ३१ जुलै, २०२१ रोजीनुसार एखादा प्रतिभूत धनको व/वा अ-प्रतिभूत धनको जे संबंधित असतील, ज्यांचे नाव अठराव्या अर्जदार कंपनीचे प्रतिभूत धनकों वा अ-प्रतिभूत धनकोंच्या सूचीमध्ये असेल तेच केवळ सूचनेत विहित प्रस्तावित ठरावांवर आपले मत देण्यास तसेच प्रतिभूत धनको व/वा अ-प्रतिभूत धनकोंच्या, जे संबंधित असतील, सभांमध्ये उपस्थित राहण्यास पात्र असतील. प्रतिभूत धनको/ अ-प्रतिभूत धनको यांचा मतदान हक्क हा निर्धारित अंतिम तारीख अर्थात शनिवार, दि. ३१ जुलै, २०२१ रोजीनुसार अठराव्या अर्जदार कंपनीद्वारे विहित थकित रकमेच्या प्रमाणात असेल.

सदर योजनेसंदर्भात किंवा वरील सभांमध्ये विचारविनिमय करावयाच्या प्रस्तावित विषयासंदर्भात अठराव्या अर्जदार कंपनीचे प्रतिभूत धनको व अ-प्रतिभूत धनको यांना कोणतीही माहिती हवी असल्यास त्यांनी संबंधित सभांच्या तारखेच्या किमान सात दिवस अगोदरपर्यंत investorrelations@futuregroup.in येथे ई-मेलद्वारे लिखित विनंती पाठवावी.

ई-मतदानाशी संबंधित कोणतेही प्रश्न/तक्रारी कंपनी सचिव यांना ई-मेलद्वारे investorrelations@futuregroup.in येथे पाठवाव्यात किंवा एनएसडीएल यांना evoting@nsdl.co.in येथे ई-मेलद्वारे पाठवाव्यात.

सही/-

**दिनांक : ०९ ऑक्टोबर, २०२१** **कंपनीचे प्रतिभूत धनको व**
**ठिकाण : मुंबई** **अ-प्रतिभूत धनकोंच्या सभेसाठी नियुक्त अध्यक्ष**